महाराष्ट्र शासन

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

https://admission.dvet.gov.in ; www.dvet.gov.in ; itiadmission@dvet.gov.in

सत्यमेव जयते

# शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ऑगस्ट २०२५ सत्रासाठी प्रवेश सूचना

## ITI Admission Portal: https://admission.dvet.gov.in

राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेतंर्गत (Craftsman Training Scheme) ऑगस्ट-२०२५ सत्रातील प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया (Centralized Online Admission Process) पध्दतीने करण्यांत येत असून प्रवेशाचे सविस्तर वेळापत्रक प्रवेश संकेत स्थळावर https://admission.dvet.gov.in उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**-: प्रवेशाचे सुधारित वेळापत्रक :-**

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रीयेचा तपशील | प्रारंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| **१.०** | **नव्याने ऑन लाईन प्रवेश अर्ज करणे व प्रवेश अर्ज निश्चित करणे :** | | |
| १.१ | विहीत मुदतीत प्रवेश अर्ज सादर करु न शकलेल्या उमेदवारांना संधी उपलब्ध करुण देण्यासाठी ऑन लाईन पध्दतीने प्रवेश अर्ज भरणे, अर्जात दुरूस्ती (Edit) करणे व प्रवेश अर्ज शुल्क भरणे, अर्ज निश्चित करणे. | २९ ऑगस्ट, २०२५ स.९.०० वाजेपासून | ३० ऑगस्ट, २०२५ सायं.५.०० वाजेपर्यंत |
| १.२ | नव्याने प्राप्त झालेले अर्ज व यापूर्वी सादर झालेले अर्ज याची एकत्रित गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे | | ३० ऑगस्ट, २०२५ सायं.७.०० वा |
| **१३.०** | **संस्थास्तरीय समुपदेशन फेरी** | | |
| १३.१ | सर्व शासकीय व खाजगी औ.प्र. संस्थातील रिक्त जागा संस्थास्तरीय समुपदेशन फेरीव्दारे भरण्यासाठी उपलब्ध राहतील. सदर प्रवेश फेरीकरिता उपलब्ध जागांचा तपशील संकेतस्थळावर प्रकाशित करणे. | २७ ऑगस्ट, २०२५, सायं. ५.०० वाजता | |
| १३.३ | प्रवेशोच्छुक व नोंदणीकृत उमेदवारांनी संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत व्यक्तीश: हजर राहुन समुपदेशन फेरीकरीता हजेरी नोंदवावी. | ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत दररोज स.८.०० वाजेपासून ते दु.१२.०० वाजेपर्यंत | |
| १३.४ | हजेरी नोंदविलेल्या उमेदवारांमधून संबंधित संस्थास्तरावर गुणवत्ता यादी तयार करुन प्रकाशित करणे. | ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत दररोज दु.१.०० वाजता | |
| १३.५ | संस्थास्तरावर तयार केलेल्या गुणवत्ता यादी नुसार उमेदवारांना समुपदेशनाकरिता बोलाविण्यात येईल. प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करण्यात येईल. | ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत दररोज दु.०१.०० वाजेपासून ते अंतिम उमेदवारापर्यंत | |
| १३.६ | सदर प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर संबंधित संस्थेत त्याच दिवशी प्रवेशाची प्रत्यक्ष कार्यवाही करावी. उमेदवारांनी त्याच दिवशी प्रवेश निश्चित न केल्यास सदर जागा दुसऱ्या दिवशी रिक्त समजुन प्रवेशासाठी खुली करण्यात येईल. | ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत दररोज दु.०१.०० वाजेपासून ते अंतिम उमेदवारापर्यंत | |
| **१३.०** | **खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील संस्था स्तरावरील प्रवेश** | | |
| १३.१ | खाजगी औ.प्र.संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागा (माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. १.४ प्रमाणे) व संस्थास्तरीय प्रवेश फेरीनंतर खाजगी औ.प्र. संस्थांमध्ये रिक्त राहिलेल्या जागा संबंधित खाजगी औ.प्र. संस्थाना संस्थास्तरावर भरण्यासाठी उपलब्ध होतील. | ०८ जुलै, २०२५ स.९.०० वाजेपासून | प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम दिनांकापर्यत |

वरील प्रवेश वेळापत्रक सूचक दर्शक असून त्यात बदल संभवतो. अद्ययावत प्रवेश वेळापत्रक प्रवेश संकेतस्थळावर व सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच नोंदणीकृत उमेदवारांना SMS व्दारे वेळोवेळी कळविण्यात येईल. संपूर्ण प्रवेश प्रक्रिये दरम्यान उमेदवारांनी वेळोवेळी प्रवेश संकेतस्थळास भेट देणे त्यांचे हिताचे राहील.

**-: महत्वाची सुचना :-**

१. उमेदवाराने त्याच्या प्रवेश खात्याचा (Admission Account) पासवर्ड (Password) कोणासही देऊ नये व त्यासंबंधी संपूर्ण गोपनीयता पाळावी. Password विसरल्यास तो Reset करण्याची सुविधा प्रवेश संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (PPP) अंतर्गत राज्यात असलेल्या २५० औ.प्र.संस्थांमधील सर्व अभ्यासक्रमातील २०% जागा या माहिती पुस्तिकेत दिलेले "विशेष प्रशिक्षण शुल्क" आकारुन गुणवत्तेनुसार भरण्यात येतील. त्या जागांसाठी इच्छुकांना Online प्रवेश प्रक्रीयेत स्वतंत्र विकल्प (Option) देण्याची मुभा राहणार आहे. उदा. Fitter-IMC, Welder-IMC, etc. उमेदवारांनी अशा जागांसाठी विकल्प सादर करण्यापूर्वी माहितीपुस्तिकेत प्रशिक्षण शुल्काबाबत (मुद्दा क्र. १५.१) माहिती वाचावी.

३. शासकीय औ.प्र. संस्थांमधील पब्लिक प्रायवेट पार्टनशिप (पीपीपी) योजनेंतर्गत प्रवेशासाठी उपलब्ध जागा (IMC Seats) व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने प्रवेश देण्यात येणाऱ्या जागांवर प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांना त्यांच्या प्रवर्गानुसार ८० ते १००% व्यवसाय प्रशिक्षण प्रतिपूर्ती योजना लागू करण्यात आली आहे. व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेंतर्गत दिले जाणारे लाभ, योजनेसाठी पात्रता व आवश्यक कागदपत्रे या बाबत सविस्तर माहिती माहिती पुस्तिकेत व प्रवेश संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

४. प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर ज्या शासकीय औ. प्र. संस्थांमधील व्यवसायांत एकूण प्रवेश क्षमतेच्या ५०% पेक्षा कमी प्रवेश झाले असतील अशा

व्यवसायातील प्रवेशित उमेदवारांना त्याच संस्थेत इतर व्यवसायात किंवा जवळच्या दुसऱ्या शासकीय औ.प्र. संस्थेतील संबंधित व्यवसायात सामावून घेण्यात येईल. (माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. २२.१)

५. राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औ.प्र. संस्थांतील सर्व प्रकारच्या जागांसाठी प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने होत असून केंद्रीय पध्दतीत उपलब्ध जागा व संस्थास्तरावरील जागांसाठी ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन प्रवेश प्रणाली व्यतिरिक्त प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांचे प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाही याची सर्व उमेदवार, पालक व औ.प्र. संस्थांनी नोंद घ्यावी.

६. केद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रीयेत सहभागी खाजगी औ.प्र. संस्था व त्यातील व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्या हया कायम विनाअनुदानित तत्वावर शासन मान्यताप्राप्त व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परीषद (NCVT) यांचेशी संलग्न आहेत. या व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्यांमधील प्रवेशित व प्रशिक्षण घेणाऱ्या उमेदवारांची परीक्षा - अखिल भारतीय व्यवसाय प्रमाणपत्र परीक्षा (AITT) ही शासकीय औ.प्र.संस्थांतील उमेदवारांप्रमाणेच घेण्यात येवून उत्तीर्ण उमेदवारांना राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र (NTC) बहाल करण्यात येते. उमेदवारांनी खाजगी औ.प्र. संस्थांमध्ये संस्थास्तरावरील जागांसाठी प्रवेश घेण्याअगोदर, ते ज्या व्यवसाय अभ्यासक्रमाच्या तुकडीत प्रवेश घेत आहेत ती व्यवसाय अभ्यासक्रमाची तुकडी NCVT शी संलग्नीत आहे का ते NCVT-MIS पोर्टल www.ncvtmis.gov.in वर ITI Search या मथळ्या खाली तपासावे. असंलग्नीत व्यवसाय अभ्यासक्रमाच्या तुकडीत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांची परीक्षा संचालनालयामार्फत घेण्यात येणार नाही.

७. राज्यातील सर्व शासकीय व मान्यता प्राप्त खाजगी औ.प्र. संस्था व या संस्थेतील संलग्न व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्यांची यादी https://admission.dvet.gov.in, www.dvet.gov.in तसेच www.ncvtmis.gov.in या संकेतस्थळांवर देखिल उपलब्ध आहे. तरी प्रवेशोच्छुक सर्व उमेदवारांनी सदर संकेतस्थळांना एकवेळ अवश्य भेट दयावी.

-Sd-

(माधवी सरदेशमुख, भा.प्र.से.)

संचालक

स्थळ: मुंबई

दिनांक: २९ ऑगस्ट, २०२५